संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

**श्राव्या डायग्नोस्टिक्स**

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ९९ वा ● ● रविवार दि. २१ जानेवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# जग्वार सिटीत आज प्लॉट धारकांवर होणार बक्षिसांचा वर्षाव


## चार अलिशान कार, तीन बुलेटसह विविध बक्षिसांचे होणार वितरण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी येथील आटपाडी-मुढेवाडी रस्त्यालगत असणाऱ्या जग्वार सिटीत उद्या १५० प्लॉट धारकांवर आज दिनांक २१ रोजी सायंकाळी ०५ वाजता बक्षिसांचा वर्षाव होणार असून यामध्ये विजेत्यांना चार अलिशान कार, तीन बुलेट, दोन ॲक्टीव्हा अशा बक्षिसांची सोडत होणार आहे. या कार्यक्रमासाठी सिने अभिनेते मिलिंद गुणाजी व सिने अभिनेत्री पूजा सावंत यांच्यासह खासदार संजयकाका पाटील, सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांच्या उपस्थित बक्षीस सोडतीचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.

आटपाडी-मुढेवाडी रस्त्यालगत जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ एकर परीसरामध्ये ५०० एन.ए. प्लॉटची अत्याधुनिक जग्वार सिटी उभारली गेली आहे.

आटपाडीमध्ये प्रथमच मोठ्या प्रमाणात एन.ए. असणारी जग्वार सिटी ही एकमेव आहे. या ठिकाणी आकर्षक कमान, अंतर्गत रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडे, नाना-नानी पार्क,



संजयकाका पाटील



अमरसिंह देशमुख



मिलिंद गुणाजी



पूजा सावंत

ओपन जीम, अंडरग्राउंड ड्रेजेन यासह अनेक सोई-सुविधा उपलब्ध आहेत. आज दिनांक २१ रोजी पहिल्या १५० प्लॉट धारकांसाठी बक्षिसांची सोडत होणार आहे. यामध्ये विजेत्यांवर विजेत्यांना चार अलिशान कार, तीन बुलेट, दोन ॲक्टीव्हा अशा बक्षिसांचा वर्षाव होणार आहे. तर सामाजिक जाणीव ठेवत आटपाडी तालुक्यातील १५० आशा स्वयंसेविका यांना सायकल वाटप करण्यात आहे.

JAGWAR CITY

सस्नेह निमंत्रण

SHREE VNS NIRMAAN GROUP
आता
**शिवजल ग्रुप**
हक्काची सावली देणारी माणसं...

प्रथम १५० प्लॉट खरेदीखत केलेल्या भाग्यवान ग्राहकांचा

**वचनपुर्ती**

फोरव्हिलर व टू व्हिलर गाड्यांचा

**बक्षिस वितरण समारंभ**

**व आटपाडी तालुक्यातील (१५०)**
**सर्व आशा वर्कर यांना सायकल वाटप**

रविवार दि.२१ जानेवारी २०२४ रोजी सायं.५ वा. करण्याचे आयोजिले आहे.

* शुभहस्ते *

**मा.खा.संजय(काका)पाटील**
सांगली लोकसभा

* प्रमुख पाहुणे *

**मिलिंद गुणाजी**
सिने अभिनेते

**पुजा सावंत**
सिने अभिनेत्री

* प्रमुख उपस्थिती *

**श्री.अमरसिंह(बापूसाहेब)देशमुख**
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद सांगली.

तरी या कार्यक्रमास आपण उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.

निमंत्रक : **शिवजल ग्रुप (जग्वार सिटी,आटपाडी)**

+ 91 7875 361 112
+ 91 9146 561 112
jaguarcity1112@gmail.com

* पत्ता *
आटपाडी-मुढेवाडी रोड,
सुतगिरणी शेजारी,आटपाडी ४१५३०१

# संपादकीय

## गुजरातमध्ये काँग्रेसला मोठा धक्का!

आगामी लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे देशभरातील राजकीय नेते आपल्या सोईच्या पक्षात प्रवेश करत आहेत. सत्ताधारी भाजपानेदेखील देशभरात वेगवेगळ्या नेत्यांना आपल्या पक्षात सामावून घेण्याच्या मोहिमेस सुरुवात केली आहे. गुजरातमध्ये काही दिवसांपूर्वी काँग्रेसच्या एका नेत्याने आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यानंतर आता काँग्रेसला आणखी एक फटका बसला आहे. सी जे चावडा यांनी नुकतेच आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला आहे. चावडा हे आतापर्यंत तीन वेळा आमदार राहिलेले आहेत. त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा विधानसभेच्या अध्यक्षांकडे सोपवला आहे. ते विजापूरचे आमदार होते. ते माजी मुख्यमंत्री शंकरसिंह वाघेला यांचे विश्वासू मानले जातात. चावडा यांच्या राजीनाम्यानंतर आता काँग्रेसचे संख्याबळ १५ वर आले आहे.चावडा फेब्रुवारी महिन्यात भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. ते गुजरात भाजपाचे प्रवक्ते जयराजसिंह जडेजा यांच्या जवळचे मानले जातात. चावडा यांच्या या निर्णयामागे जयराजसिंह असल्याचे म्हटले जात आहे. आमदारकीचा राजीनामा दिल्यानंतर चावडा यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. सध्या राम मंदिराचे उद्घाटन केले जाणार आहे. काही वर्षांपूर्वी सर्जिकल स्ट्राईक करण्यात आली. अशा प्रसंगांवेळी काँग्रेसने अशी विधाने केली, ज्यामुळे देशाची हानी झाली. मला ते आवडलेले नाही, असे चावडा म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जागतिक नेते म्हणून उदयास आले आहेत. अमित शाह तसेच भाजपाचे इतर नेते मोदी यांना मदत करत आहेत. त्यामुळे अशा मोहिमेमध्ये मला अडथळा व्हायचे नाही. प्रवाहाच्या विरोधात जाण्यापेक्षा प्रवाहासोबत जाणे चांगले, असे चावडा म्हणाले. डिसेंबर महिन्यापासून काँग्रेसच्या आमदारकीचा राजीनामा देणारे चावडा हे दुसरे आमदार आहेत. याआधी खंभातचे आमदार चिराग पटेल यांनीदेखील आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यांनी भाजपाचे उपाध्यक्ष भारत बोघरा यांच्या उपस्थितीत आमदारीचा राजीनामा दिला होता. पटेलदेखील लवकरच भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. भविष्यातही काँग्रेसचे अनेक आमदार भाजपात प्रवेश करणार आहेत, असे पटेल यांनी सांगितले. काँग्रेसमधील बहुसंख्य आमदार हे नाराज आहेत. गुजरात काँग्रेसमधील गटबाजीने टोक गाठलेले आहे. पक्षातील नवे चेहरे तसेच तरुण नेत्यांना पक्षात प्रोत्साहित केले जात नाही, असे पटेल यांनी सांगितले. चावडा हे पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक आहेत. राजकारणात येण्याआधी ते शासकीय सेवेत होते. मात्र राजकारणात सक्रिय होताच त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला होता. त्यांनी दाखल केलेल्या निवडणुकीच्या शपथपत्रात चावडा हे बांधकाम व्यवसायिक आहेत. चावडा २००२ साली पहिल्यांदा गांधीनगर मतदारसंघातून आमदार म्हणून निडवून आले. मात्र २००७ साली ते गांधीनगर मतदारसंघातून पराभूत झाले. २००९ साली त्यांनी देहगाम येथून विधानसभेची पोटनिवडणूक लढवली. मात्र ते या निवडणुकीत पराभूत झाले. त्यांनी २०१७ सालची विधानसभा निवडणूक गांधीनगर उत्तर या मतदारसंघातून लढवली. या निवडणुकीत त्यांनी विजयी कामगिरी केली. त्यांची नंतर काँग्रेसचे मुख्य व्हीप म्हणून नेमणूक करण्यात आली होती. चावडा यांनी गांधीनगर मतदारसंघातून थेट अमित शाह यांच्याविरोधात निवडणूक लढवली होती. मात्र त्यांचा पाच लाख मतांनी पराभव झाला होता. २०२२ सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी आपला मतदारसंघ बदलला होता. त्यांनी ही निवडणूक विजापूर येथून लढवत विजय मिळवला. २०२२ सालच्या निवडणुकीत काँग्रेसचे एकूण १७ उमेदवार निवडून आले. या १७ जणांमध्ये चावडा यांचा समावेश होता. चावडा यांच्या पत्नी फाल्गुनी या गुजरात सरकारच्या पशुसंवर्धन विभागाच्या संचालक आहेत. त्यांचा मुलगा भरतसिंह गुजरातमध्ये सेक्शन ऑफिसर आहे.

# सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते दिव्यांग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव वाटप

**पुणे :** फियाट ऑटोमोबाईल्स प्रा. लिमिटेड रांजणगाव यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम अवयवाचे वाटप सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील दिव्यांग मुलांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन श्री. वळसे पाटील यांनी यावेळी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, फियाट इंडियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष राकेश बवेजा, सहाय्यक उपाध्यक्ष संचिता कुमार, प्रदीप मुनगंटीवार, गट शिक्षण अधिकारी सविता माळी गट विकास अधिकारी अर्चना कोल्हे, प्रदीप वळसे पाटील, बाळासाहेब बाणखेले, उदय पाटील, प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

श्री.वळसे पाटील म्हणाले, समाजामध्ये अनेक मुलं हे दिव्यांग असल्याने त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होण्याची शक्यता असते. त्यांना वेळीच मदतीचा हात दिल्यास त्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होऊन ते सक्षमपणे जीवन जगू शकतील. यासाठी फियाट इंडिया ऑटोमोबाईल्सने जुन्नर, आंबेगाव व खेड या तीन तालुक्यातील दिव्यांगांसाठी कृत्रीम अवयवे व संसाधने वाटप करण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. या उपक्रमामुळे या दिव्यांग मुलांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

श्री. बवेजा आणि संचीता कुमार यांनीही मनोगत व्यक्त केले. शिबिरात १५३ दिव्यांग विद्यार्थ्यांना मंत्री वळसे पाटील, राकेश बवेजा यांच्या हस्ते कृत्रिम अवयव व संसाधनांचे वाटप करण्यात आले.

महाविद्यालयाला ४० संगणक भेट

फियाट ऑटोमोबाईल्स प्रा. लिमिटेड रांजणगाव यांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून मंचर येथील रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाला ४० संगणक भेट देण्यात आल्याने तयार करण्यात आलेल्या संगणक प्रयोगशाळेचे उदघाटन मंत्री श्री.वळसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन एस. गायकवाड. उदय पाटील, बाळासाहेब बाणखेले यावेळी उपस्थित होते.

या प्रसंगी बोलतांना श्री.वळसे पाटील म्हणाले, फियाट कंपनीच्या माध्यमातून मिळालेले संगणक संच, याचा फायदा महाविद्यालयीन विद्यार्थीनी चांगल्या पद्धतीने करावा आणि रोजगारासाठी आवश्यक कौशल्य प्राप्त करून घ्यावे. स्वतः रोजगार निर्मिती करून सक्षम बनावे. स्पर्धेच्या युगात उन्नत संगणकीय ज्ञान आवश्यक असून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनातच ते आत्मसात करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात रक्तदान शिबिर संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** येथील श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या ७९ व्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयाच्या एनएसएस व एनसीसी विभाग व श्री सिद्धिविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल मिरज ब्लड बँकेच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी मानवी जीवनात रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असल्याने जास्तीत जास्त युवकांनी रक्तदान करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य व्ही. एच. पाटील हे उपस्थित होते. रक्तदान शिबिराच्या उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. तातोबा बदामे यांनी केले तर आभार एनसीसी प्रमुख कॅप्टन डॉ. विनोदकुमार कुंभार यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम आधिकारी प्रा. आण्णासाहेब बागल यांनी केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य जे.ए. यादव, नॅक समन्वयक डॉ.मेघा पाटील,डॉ.अमोल सोनवले, प्रा.रणजीत कुंभार, डॉ. नितीन गायकवाड, डॉ.डी.बी.थोरबोले, डॉ.एस.आर. घोगरे,डॉ.राहुल काळेल, प्रा.राहुल लोंढे डॉ. अर्जुन वाघ ,डॉ.विशाल पाटील उपस्थित होते.रक्तदान शिबिराचे संयोजन प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली,एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. तातोबा बदामे, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. विनोदकुमार कुंभार, एनसीसी व एनएसएस स्वयंसेवकानी योगदान दिले.



**तासगाव : वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात रक्तदान शिबिर प्रसंगी रक्तदान करताना उपस्थित रक्तदाते**

# हेमंत सोरेन यांची ईडी चौकशी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**रांची :** सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शनिवारी झारखंडचे मुख्यमंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे (झामुमो) कार्यकारी अध्यक्ष हेमंत सोरेन यांची चौकशी सुरू केली. सोरेन यांच्या अधिकृत निवासस्थानी दुपारी १ वाजता 'ईडी'चे अधिकारी पोहोचले. झारखंडमध्ये मोठ्या प्रमाणात जमिनीची मालकी बेकायदा पद्धतीने गुंडांना देण्यात आल्याचा आरोप आहे.



**हेमंत सोरेन**

ईडीने या प्रकरणात आतापर्यंत १४ जणांना अटक केली असून त्यामध्ये २०११ च्या तुकडीचे सनदी अधिकारी छावी रंजन यांचाही समावेश आहे. या प्रकरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सोरेन यांचा सहभाग असल्याचा आरोप आहे. यापूर्वी सात वेळा 'ईडी'समोर जाण्याचे टाळले होते.




# मराठा आरक्षणाचा निर्णय फेब्रुवारी अखेर शक्य : तटकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कराड :** सर्वोच्च न्यायालयात यापूर्वी दोनदा मराठा आरक्षण टिकले नाही. आता ते शाश्वत टिकवायचे असल्यास काही वेळ द्यावा लागेल आणि तो वेळ मनोज जरांगे-पाटलांनी देण्याची गरज असल्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशाध्यक्ष, खासदार सुनील तटकरे यांनी केले. राज्य शासन मराठा समाजाला आरक्षण देण्यास वचनबध्द असल्याची ठाम ग्वाही तटकरे यांनी दिली. कराड विमानतळावर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकण्यासाठी त्रुटी दुरुस्ती करण्यासह कायदेशी बाबींच्या पूर्ततेसाठी कालावधी लागणार आहे. किमान महिना, दिड महिना मराठा आरक्षणाचा निर्णय घेण्यास वेळ लागू शकतो. राज्य सरकार फेब्रुवारीअखेर याबाबतचा निर्णय करेल तरी दरम्यानचा वेळ देण्यासाठी जरांगे- पाटलांनी आपले आंदोलन स्थगित करावे.



**सुनील तटकरे**

लोकसभा निवडणुकीत महायुतीचे राज्यात ४५ हून अधिक जागा जिंकण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी महायुतीच्या जागा वाटपाचा निर्णय घटक पक्षांचे नेते एकत्र बसून सखोल चर्चेअंती जानेवारीअखेरीस घेतील. तर, दिल्लीत जागा वाटपाचा अंतिम निर्णय १५ फेब्रुवारीपर्यंत होईल असे तटकरे यांनी स्पष्ट केले.

# २२ जानेवारीच्या सुट्टीला उच्च न्यायालयात आव्हान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** अयोध्येतील राम मंदिरात २२ जानेवारी रोजी श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी २२ जानेवारी रोजी अर्ध्या दिवसाची सुट्टी जाहीर केली. पाठोपाठ महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी देण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र या निर्णयाच्या विरोधात विधी शाखेच्या चार विद्यार्थ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या विशेष खंडपीठाकडे याचिका दाखल केली आहे. ज्याची सुनावणी आज होणार आहे.

शिवांगी अग्रवाल, सत्यजित साळवे, वेदांत अग्रवाल आणि खुशी बंगिया या विधी शाखेच्या चार विद्यार्थ्यांनी सार्वजनिक सुट्टीच्या विरोधात याचिका दाखल केली आहे. विशेष खंडपीठाच्या न्यायाधीश जीएस कुलकर्णी आणि निला गोखले यांच्या समोर उद्या (२१ जानेवारी) सुनावणी होईल.

उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि गोव्यापाठोपाठ महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही येत्या २२ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ही घोषणा करण्यात आली. मात्र या सुट्टीला आक्षेप घेण्यात आला. धार्मिक कार्यक्रम साजरा करण्यासाठी सार्वजनिक सुट्टी जाहीर करणे हे घटनेत समाविष्ट असलेल्या धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे उल्लंघन करणारे आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. राज्य सरकारने स्वतःला कोणत्याही धर्माशी जोडू नये किंवा कोणत्याही एका धर्माला प्रोत्साहन देता कामा नये, असाही युक्तिवाद याचिकाकर्त्यांनी केला आहे. लाईव्ह लॉ या संकेतस्थळाने याबाबतचे वृत्त दिले आहे. याचिकाकर्त्यांनी म्हटले की, हिंदू मंदिराच्या लोकार्पणानिमित्त सरकारने सोहळे साजरे करणे आणि या माध्यमातून एका विशिष्ट धर्माशी जोडून घेणे, हे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांवर थेट घाला घालणारे कृत्य आहे. सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्याबाबतचे धोरण राजकीय पक्षाच्या मर्जीनुसार असू शकत नाही. एखाद्या देशभक्त व्यक्तीच्या किंवा ऐतिहासिक महापुरुषांच्या स्मरणार्थ सुट्टी जाहीर केली जाऊ शकते. परंतु समाजाच्या विशिष्ट घटकाला किंवा धार्मिक समुदायाला खुश करण्यासाठी अशाप्रकारे सुट्टी दिली जाऊ शकत नाही.








दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस

Email - netra7676@gmail.com
डिजीटल जम्बो
नेत्रा कलर झेरॉक्स्
७/१२ उतारे, सर्व शासकीय फॉर्म, मराठी टायपिंग
धिरज, 9503 63 8686 दिपक, 9595 04 7676 गाळा नं. ११





# मराठा समाज ‘मिशन सर्वेक्षण’ मोहीम युध्द पातळीवर - महसूलमंत्री विखे पाटील

**मुंबई :** महसूल विभागाच्या माध्यमातून मराठा समाज ‘मिशन सर्वेक्षण’ मोहीम राज्यात युध्द पातळीवर राबिण्यात येत आहे, असे प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यानी आज केले. मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने राज्यातील कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जात संदर्भात सर्वेक्षण करण्याच्या अनुषंगाने पुणे येथे गोखले इन्स्टीट्युटमध्ये मास्टर ट्रेनर्सना प्रशिक्षण कार्यक्रमास शुक्रवार पासून प्रारंभ झाला. याची माहिती मंत्री श्री. विखे पाटील यांनी माध्यमांना दिली.

पुणे येथे गोखले इन्स्टीट्युटमध्ये प्रशिक्षित मास्टर ट्रेनर्स हे जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर संबंधित प्रगणक (इन्म्युरेटर) यांना दिनांक २१ व २२ जानेवारी, २०२४ या दोन दिवसात प्रशिक्षण देणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची दृकश्राव्य माध्यम प्रणालीद्वारे महत्वाची बैठक घेण्यात आली.

हे प्रशिक्षण प्रभावीपणे पार पडावे यासाठी सदर प्रशिक्षणार्थी हे एका बॅचमध्ये ७५ पेक्षा जास्त नसतील. सर्वेच्या अनुषंगाने जिल्हा/तालुका स्तरावरच्या अधिकाऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना डॅशबोर्ड देण्यात येईल. त्यामध्ये सर्वेक्षणाची सर्व माहिती उपलब्ध असणार आहे. त्याआधारे या सर्वेक्षणाच्या प्रगतीची अद्ययावत माहिती / अहवाल राज्य मागासवर्गीय आयोगास उपलब्ध होणार आहे. तद्नंतर सर्वेक्षणाचे प्रत्यक्ष काम हे दिनांक २३.१.२०२४ ते ३१.१.२०२४ या कालावधीत युध्द पातळीवर होणार आहे. या कामासाठी महसूल, स्थानिक स्वराज्य संस्था, नगर विकास संस्था, शिक्षण विभागाचे सर्व क्षेत्रीय कर्मचारी कार्यरत राहतील.


सर्वेक्षण करताना ऑनलाईन माहिती भरत असताना खुल्या प्रवर्गाचा व्यक्ती असेल तर १२१ प्रश्न संच असलेला फॉरमॅट आवश्यक माहिती भरण्यासाठी कार्यरत होईल. सदर सर्वेक्षणाची माहिती भरताना ती चार भागामध्ये पुढीलप्रमाणे असणार आहे. पहिल्या भागात संबंधित व्यक्तीची मुलभूत माहिती जसे- आधार कार्ड, पॅनकार्ड इ., दुसऱ्या भागात संबंधित व्यक्तीची सामाजिक माहिती, तिसऱ्या भागात संबंधित व्यक्तीची शैक्षणिक माहिती व चौथ्या भागात संबंधित व्यक्तीची आर्थिक माहिती असणार आहे. याप्रमाणे १२१ प्रश्नसंचाची माहिती पूर्ण भरल्यानंतर सिस्टीमवर कॅमेरा ऑन होवून संबंधित व्यक्तीचा फोटो व स्वाक्षरी घेण्यात येवून त्याची ही माहिती संगणक प्रणालीवर जमा होणार आहे.

कुणबी , मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जाती संदर्भात आढळुन आलेल्या नोंदीच्या आधारे संबधित पात्र व्यक्तींना कुणबी,मराठा-कुणबी, कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर जिल्हयात शिबिरांचे आयोजन करुन पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र तातडीने निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच ज्यांच्या कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा अशा नोंदी आढळून आलेल्या आहेत, त्या संबधित नागरिकांना निदर्शनास येण्याच्या अनुषंगाने त्यांच्या याद्या सर्व तलाठी यांच्या मार्फत गाव स्तरावर मोहिम स्वरूपात प्रसिद्ध करण्यात येणार आहे, जेणेकरून पात्र नागरीकांना जातीचे प्रमाणपत्र प्राप्त होण्याकरता सदर नोंदी या पुरावा म्हणून सादर करता येतील. युध्दपातळीवर होणाऱ्या सर्वेक्षणाच्या प्रगतीवर आपण स्वत: लक्ष ठेवून असणार असल्याचे मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

## मतदार यादी २३ जानेवारीला प्रसिध्द होणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



**सांगली :** भारत निवडणूक आयोगाने दिनांक १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केलेला आहे. या कार्यक्रमानुसार मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी करण्याचा दिनांक २२ जानेवारी २०२४ (सोमवार) असा होता. तथापि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १९ जानेवारी २०२४ च्या अधिसूचनेनुसार परक्राम्य संलेख अधिनियम, (१८८१ चा २६) कलम २५ अन्वये सोमवार, दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी श्री राम लल्ला प्राण-प्रतिष्ठा दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्यानुसार अंतिम मतदार याद्या दिनांक २३ जानेवारी २०२४ (मंगळवार) रोजी प्रसिद्ध करण्याचे निर्देश भारत निवडणूक आयोगाने दिले आहेत, असे उप जिल्हा निवडणूक अधिकारी निता सावंत-शिंदे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# मागासवर्ग आयोगातर्फे २३ जानेवारीपासून युद्धपातळीवर सुरु होणार सर्वेक्षण

## यंत्रणा सज्ज ठेवा, गावोगावी दवंडी द्या, नागरिकांना माहिती द्या; अचूक, कालबद्धपणे काम व्हावे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगामार्फत २३ जानेवारीपासून युद्धपातळीवर सुरु होणाऱ्या सर्वेक्षणासाठी सर्व शासकीय यंत्रणा सज्ज ठेवण्याची तसेच या कामाला सर्वोच्च प्राधान्य देऊन कालबद्धरितीने अचूक सर्वेक्षण करण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले. गावोगावी दवंडी द्या, सूचना फलकांवर माहिती द्या, लोकांना या सर्वेविषयी कळू द्या, असे निर्देशही त्यांनी दिले. ते वर्षा निवासस्थानी मराठा आरक्षणविषयक बैठकीत राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते.

या बैठकीस निवृत्त न्या. दिलीप भोसले, निवृत्त न्या. मारोती गायकवाड, निवृत्त न्या. संदीप शिंदे, महसूल अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, नगरविकास प्रधान सचिव डॉ के एच गोविंदराज, इतर मागास विभागाचे सचिव अंशू सिन्हा, विधि व न्याय सचिव श्री कलोते यांची उपस्थिती होती. प्रारंभी सामान्य प्रशासन विभागाचे सचिव (साविस) सुमंत भांगे यांनी मराठा आरक्षणासंदर्भात आजवर घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती दिली.

मागासवर्ग आयोगाच्या सर्वेक्षणाचे काम २३ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत होणार असून मराठा व बिगर मराठा खुला प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात येईल. अशारीतीने राज्यातील अंदाजे अडीच कोटी कुटूंबांचे सर्वेक्षण होणार आहे. याकामी गोखले इन्स्टिट्युट, आयआयपीएस या नामांकित संस्थांची मदत होणार आहे.

**सामाजिक भावनेने काम करण्याचे आवाहन**

मराठा समाजाला टिकणारं आणि कायद्याच्या चौकटीत बसणारं आरक्षण मिळवून देण्यासाठी राज्यशासन कटीबध्द असून प्रशासनाने सुध्दा या अतिशय महत्त्वाच्या कामामध्ये पूर्णशक्ती एकवटून एक सामाजिक भावनेने हे काम करावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित वर्षा बंगल्यावर मराठा आरक्षणविषयक बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीला उपस्थित अधिकारी

**गावोगावी दवंडी द्या, सूचना फलकांवर माहिती द्या**

मुख्यमंत्री म्हणाले की, हे सर्वेक्षण अतिशय महत्वाचे असून तीनही शिफ्ट्समध्ये काम करावे. गावोगावी या सर्वेक्षणाबाबत दवंडी द्या, ग्रामपंचायतीच्या फलकांवर सुचना द्या तसेच विविध माध्यमातून लोकांना याविषयी माहिती द्या. सर्वेक्षणाला येणाऱ्या व्यक्तीला प्रत्येक घरातून माहिती मिळाली पाहिजे, म्हणजे परिपूर्ण आणि बिनचूक सर्वेक्षण होईल. सर्वेक्षणाच्या काळात तहसीलदार आणि सर्व संबंधितांनी दररोज आपल्या कामाचा अहवाल द्यायचा आहे.

**२४ तास कॉल सेंटर सुरु ठेवा**

यावेळी गोखले इन्स्टिट्यूटचे अजित रानडे यांनी सर्वेक्षणाबाबत माहिती दिली. शिक्षक, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, तलाठी असे सव्वा लाख पेक्षा जास्त प्रगणक आठ दिवसात हे काम पूर्ण करणार आहेत, असे ते म्हणाले. ३६ जिल्हे, २७ नगरपालिका, ७ कॅन्टोनमेंट क्षेत्रात प्रशिक्षण आजपासून सुरु झाले आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, प्रगणकांचे तसेच अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण अतिशय व्यवस्थितपणे करा तसेच आपल्या अहवालात देखील प्रशिक्षण सत्र, बैठका या सर्व बाबींचे रेकॉर्ड ठेवा. न्या. गायकवाड अहवालातील त्रुटी दूर करणे गरजेचे आहे, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, २००८ मधील अहवाल आणि सध्याचा मागासवर्ग आयोगाचा अहवाल यात नेमका काय फरक आहे आणि नव्याने कसा हा इंटेन्सिव्ह डेटा संकलित करण्यात येत आहे, हे व्यवस्थित तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**वंशावळीसाठी तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली समिती करा**

कुणबी नोंदीबाबत वंशावळी जुळविणे महत्वाचे असून नोंदीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी बार्टी तसेच इतर सक्षम संस्थेच्या तज्ज्ञांचे पथक तातडीने नेमण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले. या पथकात मोडी भाषा तज्ज्ञ, तहसीलदार यांचा समावेश करा. ज्या गावांत अत्यल्प नोंदी सापडल्या आहेत, तिथे परत खातरजमा करण्यासाठी विशेष मोहीम राबवा, दवंडी द्या, तसेच पोलीस पाटील व खासगी व्यक्तींकडे काही कागदपत्रे असतील तर तीही स्वीकारा, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**ऑक्टोबरपासून १ लाख ४७ हजार कुणबी प्रमाणपत्रे वितरीत**

निवृत्त न्या, संदीप शिंदे यांच्या समितीने काम सुरु केल्यापासून १ लाख ४७ हजार कुणबी नोंदी प्रमाणपत्रे संबंधिताना वितरीत करण्यात आले आहेत. एकट्या मराठवाड्यात ३२ हजार नोंदी आढळल्या असून १८ हजार ६०० कुणबी प्रमाणपत्रे दिली आहेत. न्या संदीप शिंदे समितीने लातूर, मराठवाड्यात बैठकीची दुसरी फेरी पण पूर्ण केली आहे, अशी माहिती सुमंत भांगे यांनी यावेळी दिली.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पिलीव/वार्ताहर :** स्वभिमानी शेतकरी संघटनेची माळशिरस तालुक्यातील नूतन पदाधिकारी निवडी व आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माळशिरस तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक संपन्न झाली. या बैठकीत संघटनात्मक बांधणी व बूथ बांधणी याचा आढावा घेण्यात आला व त्या अनुषंगाने जबाबदाऱ्यांचे वाटपही करण्यात आले. ताकदीने स्वबळावर या निवडणुकीला सामोरे जाण्याचा निर्णय या बैठकीत सर्वांनी घेतला.कोणत्याही क्षणी दूध दर वाढ आंदोलन गनिमी काव्याने होणार आहे, त्यादृष्टीने देखील रणनीती यावेळी आखण्यात आली. निवडणुकीच्या कामात आंदोलनाकडे दुर्लक्ष होता कामा नये, हेही निक्षून ठरवले. शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लागावे याकडे नेहमीच प्राधान्य राहणार आहे. एक नवी ऊर्जा घेवून ताकदीने कामाला लागण्याचा निश्चय सर्वांनी यावेळी केला.




माळशिरस : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस उपस्थित संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते

> माजी खासदार राजू शेट्टी यांच्या आदेशाने स्वाभिमानी शेतकरी संघटना लोकसभेची निवडणूक स्वबळावर लढणार आहोत त्या अनुषंगाने कार्यकर्त्यांनी कामाला लागावे.
>
> **अजित बोरकर**

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे मार्गदर्शक मगन काळे, पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजी चव्हाण,माढा लोकसभेचे अध्यक्ष कमलाकर माने-देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष मदनसिंह जाधव, तालुकाध्यक्ष अजित बोरकर, युवा आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष दत्ता भोसले,संघटनेचे विधीतज्ञ ड, सिताराम झंजे, संघटनेचे मार्गदर्शक डॉ.सचिन शेंडगे तालुका उपाध्यक्ष सिराज तांबोळी, विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष शिवराम गायकवाड,पै.दादा काळे, राजेश खरात, सचिन बोरकर, महेश चव्हाण, विजय वाघबरे, मुसा शिंदे यांच्यासह संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

SHREE VNS NIRMAAN GROUP
आता
शिवजल ग्रुप
हक्काची सावली देणारी माणसं...

* शिवजल ग्रुप उद्दिष्टे *

५ लाख घरे बांधणे,
१ कोटी झाडे लावणे
१ हजार उद्योजक घडवणे

JAGWAR CITY

'गुणवत्ता' आणि 'सचोटी' यांचा सुसंगम
‘हक्काची सावली देणारी माणसं’ असे ब्रीदवाक्य भूषविणाऱ्या ‘व्हीएनएस ग्रुपने’
रिअल इस्टेटच्या क्षेत्रात स्वत:ची स्वतंत्र मोहोर उमटवली आहे.
ग्राहकहित केंद्रस्थानी ठेवून 2010 सालापासून सुरु असलेली ही व्रतस्थ वाटचाल,
आज एका नव्या वळणावर येऊन ठेपली आहे. एकूण 50 महत्वाकांक्षी
प्रकल्प तसेच ५00 एकर लॅन्ड डेव्हलपमेंटचा प्रदीर्घ अनुभव पाठीशी असलेली ही कंपनी,
'दर्जा', 'सचोटी' आणि 'ग्राहकसेवा' या त्रिसूत्रीवर यशाचे नवे शिखर सर करत आहे.
‘प्रत्येक सामान्य माणसाला हक्काचे घर मिळावे’ या प्रेरणेतून, अवघ्या महाराष्ट्रात ग्राहकांना
सर्वात योग्य दरात प्लॉट/घर देणारी गृहनिर्माण संस्था म्हणून व्हीएनएस ग्रुप ख्यातकीर्त आहे.
याकरिता कंपनीला ‘महाराष्ट्र गौरव’ पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले आहे.
आटपाडीतील ३३ एकरातील गोविंद पार्क या पहिल्या प्रकल्पाच्या यशानंतर 'जॅग्वार सिटी' हा
कंपनीचा नूतन प्रकल्प देखील ग्राहकांच्या पसंतीस उतरेल, यात तिळमात्र शंका नाही.

